
युगाणी
विश्वनाथ खैरे

विश्वनाथ खैरे

# युगाणी

साधना प्रकाशन

बालदिन : १४ नोव्हेंबर १९७९

© उमादेवी खैरे, एम्. ए.

प्रकाशक : नाना डेंगळे, साधना प्रकाशन, ४३०/३१ शनिवार पेठ,
पुणे ४११ ०३०

मुद्रक : नाना डेंगळे, साधना प्रेस, ४३०/३१ शनिवार पेठ,
पुणे ४११ ०३०

किंमत रु. ३.००

मुलांना

आवडतात म्हणून

— भाऊ

**युगाणी** तुम्हा मुलामुलींसाठी लिहिली आहेत.

'चांदोबा चांदोबा भागलास का' असे तुम्ही म्हणताच. आता माणसं चांदोबावर जाऊनही आली. तेव्हा युगाणे म्हणा : 'चांदोबा चांदोबा येऊ का, येऊ का। पाठीवर पाय तुझ्या देऊ का, देऊ का'

असेच आणखी खूप. कुठे अडले तर मोठ्या माणसांना, शिक्षकांना विचारा.

तुमच्यासाठी दरसाल 'साधना' कुमार अंक काढणारे यदुनाथ थत्ते आणि यशवंत चौधरी यांना युगाणी फारच आवडली. 'किशोर'च्या संपादकांनी दोन-तीन छापलीही.

त्या सर्वांना मनापासून आनंद होईल, युगाणी तुम्हाला आवडली, तुम्ही म्हटली तर! तेव्हा, ती वाचा, म्हणा आणि तशी आणखी लिहा पण.

मद्रास

विश्वनाथ खैरे

## दिव्या दिव्या

दिव्या दिव्या दीपत्कार
विजेचा तू साक्षात्कार

कळीस दाबता हाती
वीज निघाली सळसळती

तारेची फुलली तात
उजेड खुलला गेंदात

आकाशी वीज देवाची
कामाला ही भुइवरची

दिवा लावला ज्ञानेसी
नमस्कार हा सर्वांसी

▣ ▣

## चांदोबा चांदोबा

'चांदोबा चांदोबा येऊ का, येऊ का
पाठीवर पाय तुझ्या देऊ का, देऊ का'
'येवढ्या लांब तू येशिल कसा
हवा ना पाणी राहशिल कसा'

'यानात बसेन मी, उडाण मारीन
हवा नि पाणी संगेच आणीन'
'धरणीमाय तुला सोडायची नाय
गारठा नि धग इथं सोसायची नाय'

'राकेट्ट झाडीन सुटवेग घेईन
गवेश घालून उतरायला येईन'
'चुकशिल एकटा अंधार दाट
खळग्या-शिळांनी भरलि माझी पाठ'

'गणकोबा देतील आखून वाट
खेच तुझी थोडी माझी उडी अफाट'
'बराऽय बाबा, येऊन जा
इथून पृथ्वी पाहून जा'

## गणगावची गंमत

कुठे कुठे कुठे कुठे
कुठे कुठे, गणगाव मोठे

गावातले लोक सारे थोटे
हाताला त्यांच्या नाहीत बोटे
तरी न त्यांचे अडे कुठे
कुठे कुठे गणगाव मोठे

हात उजवेडावे वीर फाकडे
मोजमाप सारे दोघांकडे
एक आणि शून्य दोन आकडे
'दोनमान' म्हणती गुरुजी मोठे

म्हणतात दोन ते लिहितात दहा
एकावर एक ते तीन झाले पहा
आपण म्हणू शंभर, त्यांचे चार अहा
गणगावच्या थोटयांची नवलाई वाटे

आकडेमोडीला वेग बिजलीचा
एक-शून्यांचा नाच कळीचा
संकेत बसतो हो ज्याचा त्याचा
आपण खरे तरी थोटे नव्हेत खोटे

## खात नाहीत पीत नाहीत

खात नाहीत पीत नाहीत
श्वास सुद्धा घेत नाहीत
सारखे लोळत चहूकडे
उभे आडवे वेडेवाकडे

काळ्या मातीची निळ्या पाण्याची
ढवळ्या बर्फाची सावळ्या झाडीची
जाडपातळ पांघरून चादर
एकमेकावर ते डाराडूर

ऐसपैस राकट दणकट
मुकाट दिसले तरी अफाट
वय वर्षे चारशे कोटी
नव्या पिढ्याही रोजच येती

आई कधी खोकते ओकते
धूर जाळ रस फेकते
तेच सारे थंड होतात
खंड लेकरे होऊन पडतात

पाऊस येतो न्हाऊ घालतो
एकेक कण पाण्यात नेतो
ऊन वारे येऊन सारे
मोडतात हाडे फोडतात भारे

आधी चिखली नाजूक मऊ
ताकद वाढते गहू गहू
जाडजूड पठ्ठे थर-थर
हळू वाढती एक एकावर

कुणी पालटे घेउन भार
कुणा बदलते पाण्याची धार
धरणीमाय दे कुणास ठाय
चटके देऊन पैलवान कराय

यांच्यापाशी सोन्याच्या खाणी
हिरे माणकें तेल अन् पाणी
पहाडकरी हे शिलेदार
कणखर दगडो धोंडो फत्तर

▣ ▣

## धरणी माझं नाव

धरणी माझं नाऽव
आकाश आमचं गाऽव
सूर्याजी गोळा, माझा
बाबा, गावाचा राजा

आम्ही लेकरं नऽऊ
फिरत सारखी राहू
बाबा फिरतो खुंटाला
कुणाला नाही कंटाळा

आपल्या भंवती गिरऽकी
बाबाच्या भंवती फिरऽकी
एवढं मोठं अंगऽण
तरि ज्याचं त्याचं रिंगऽण

बाबाची मूरत केवढी
पाटलाच्या रांजणाएवढी
मी तर बाई केवढीशी
चिमखडि गोटी एवढीशी

जराशी तिरकी घेत गिरकी
रातंदीस मारत्ये फिरकी
भवरुन भवरुन सालोसाल
कंबर झाली फुगीर गोल

पायीडोई बर्फाळ भारा
अंगाभवती हवाइ फुलोरा
रंगारंगाची पोटी चोळी
परकराची झाक निळी

ऊन वारा पाऊस खात्ये
पोटाशी सारे खेचून धरत्ये
सावलीत अर्धी उजेडी अर्धी
जित्या भावल्यांची अंगावर गर्दी

▣ ▣

## रस्ता बांधू चला चला

मानवतेला गती द्यायला । रस्ता बांधू चला चला

टिकाव खोरे पहार हाती
खस्खस् झटपट खोदू माती
गडगड लोटू दगड खालती
झाली बघा वाट चालायला । रस्ता बांधू चला चला

खरखर यंत्री पहार फिरवू
ठसठस दारूगोळा भरवू
धडाडधुम हे डोंगर उडवू
भीति कशाची अपुल्याला । रस्ता बांधू चला चला

दुथडी भरले नद्या नि नाले
सूं सूं फूं फूं करित चालले
त्यांच्यावरती पूल बांधले–
पाहिजेत ते तरायला । रस्ता बांधू चला चला

अलगद पसरू दगड भुईवर
खडखड फोडुन खडी नि डांबर
सरसर फिरवू रूळ तयावर
नवतेचे रथ पळवायला । रस्ता बांधू चला चला

▣ ▣

## जड-ओढ

देठीचे फळ पिकले गळते
गळता धरतीकडेच पळते
अवसेपुनवे सागरजळ ते
उधाणते, तर कधी ओहटते
या साऱ्यांचे मूळ एकटे । एकच काही असेल का
कण धूळीचे घन तेजाचे
सरती फिरती चळती वळती
वेगावति मंदावति पळती
रित्या मोकळ्या अवकाशांती
कूळ गतींचे, खूळ नसावे । एक साजिरे दिसेल का
सकळ जडांची असोड खोड
एक दुज्याला लावित ओढ
जड-भारांनी जी हो गुणिता
घटते वेडी अंतर गुणिता
जड-ओढीने जग हे चलते । मूळ तिचेही मिळेल का
स्थळकाळांची अतूट वीण
चारमितींची कळण्या कठिण
तिच्यात करिती वस्तू फुगवण
जड-ओढ तिचे जाणा वाकण
न कळून कळे किति सार मिळे । ओढ-अणू कुणि असेल का

## गत्याचे गाणे

धाव धाव धावेन मी
मग कसा धावेन

तुरकी चाल तशि दुडकी चाल
जोरात्त जाईन कसे पकडाल

लोळता रोळता भुइवरती
घासेन भाजेन वरखालती
म्हणून वारा होईन मी
वाटेल तेथे जाईन मी

गूं गूं गूं गूं आवाज
कानाशी लागून जाईन मी
हाक मारलीत तरी पोचायची नाही
बोलवाल कसे ते पाहीन मी

आभाळगाडीचा घेईन वेग
फेरे मारमारून पाहीन जग
हलका फुलका जगता गोळा
दिसेन दिवसात सतरा वेळा

झटपट का हळू माहीत नाय
भारगोळा पार माझा विरळत जाय

दिसत नाही तरि दाखवीत जाय
उजेडकण मी होणार हाय

एक दोन तीन म्हणा,
चांदोबावर दडी
घटकेत दोनदा
सूर्यावर उडी

कणांचा घाट, कधी
तरंगांची लाट
लाख साल धावलो तरी
सरत नाही वाट

कधितरी येईन मी
खिडकीवाटे पाहीन
म्हातारे बाबा तुम्ही,
मी तर पोरच राहीन

▣ ▣

## अणू रे अणू

‘ अणू रे अणू तू आहेस कुठे ’
‘ जगात जिथे काही असेल तिथे
असे तरी, असे तसा
असेन तेव्हा दिसेनासा ’

‘ अणू रे अणू तू आहेस काय ’
‘ कणांचा पुंजका, गठ्ठा नाय
कितीक चिनुले कण-कणुले
धनुले उणुले अन् बिनुले
खेळ त्यांचा गिरकीचा
छोट्याशा रिंगणी फिरकीचा
एकास दुसरा मिळतो रे
कुणाशि कोणी जुळतो रे
घटतो भार, निघते तेज
भारंभार ते मिळते मोज ’

‘ अणू रे अणू आहात किती
लावाल माया की दावाल भीति ’
‘ आठदहा रे आळींचे
आम्ही ब्याण्णव कुळींचे

उणुले अमुचे माळवितो
जग हे सारे मेळवितो

बिनुले धनुले गाभ्याचे
ठोंबे साऱ्या वजनाचे

जेव्हा बिनुले भेटतात
फुटतात किंवा फुजतात

त्या भेटींची साखळी
अफाट शक्ती मोकळी

मोकाट सोडा जाळील
मुठीत ठेवा पाळील'

▣ ▣

## यंत्रजागर

ठण् ठण् हूँ ऊँ उजाडला दीस
नादांच्या नादात प्रहरावा तास

सूंरूं सूं रूं सरळावे लोह
चुर् चुर् चर् चर् शीतळावा दाह

खाट् खाट् खट् फट् फोडाव्या शिळा
गूं ऊं धो धो भिजवावा मळा

घर् घर् घण् घण् गुणगुण यंत्रांची
कानी गाजे वाजे धारा गतिच्या मंत्रांची

कानांच्याही पार कित्ती लाटांचे सागर
दाही दिशां सुखदायी व्हावा यंत्रजागर

▣ ▣

# भूमिका

भाषा हे विचाराचे वाहन आहे. साहित्य आपल्या विचारांचा आशय कलात्मकतेने प्रकट करते. काव्यात हाच कलात्मक आशय अधिक साकळून व्यक्त होत असतो. माणसाच्या विचाराला बंधन नसते; साहजिकच भाषेला, साहित्याला आणि म्हणून काव्याला विषयांचे, विचारांचे, वर्णनांचे किंवा इतर कसलेही बंधन पडूच शकत नाही. माणसाच्या माणूसपणामुळे असलेल्या मर्यादा सोडून दुसऱ्या कोणत्याच मर्यादा काव्याला जाणवत किंवा मानवत नाहीत. कवी स्वतःला 'निरंकुश' म्हणवून घेत आलेच आहेत. 'रवीला दिसत नाही ते कवीला दिसते' किंवा 'कवी हा क्रांतदर्शी असतो' यासारखी जुनी वचने काव्याचा हा आवाका आणि व्याप व्यक्त करीत असतात.

साहजिकच असे वाटते की, विश्वाच्या एकूण व्यापाराचे जे काही ज्ञान कवीला भावते तेही काव्यात व्यक्त व्हावे. अशा ज्ञानात, स्वतःला उपलब्ध झालेल्या अन्य मानवांच्या संचित ज्ञानाचाही समावेश व्हावा; कारण कवी झाला तरी माणूस म्हणून तो अनन्यस्वतंत्र थोडाच असतो! अशा संचित ज्ञानात, मानवाने ज्ञानेंद्रियांनी आणि इतर अनेक भौतिक साधनांनी विश्वाचे जे ज्ञान मिळवले आहे–जे विज्ञान म्हणून ओळखले जाते–त्याचे स्थान अतिशय महत्त्वाचे आहे. या विज्ञानाच्या अनुभवांचा आढळ काव्य प्रांतात बहुधा होत नाही. 'विज्ञानाच्या आधारे काव्य', 'विज्ञानाविषयी काव्य', 'विज्ञानकाव्य' असले शब्दप्रयोग वदतोव्याघात वाटावेत इतका विरोध 'काव्य' आणि 'विज्ञान' यांच्यात मानला गेला आहे.

तसे विज्ञान काव्याला चुकले आहे असा काही प्रकार नाही. अगदी आदिकालापासून काव्यात ते अप्रत्यक्षपणे अंतर्भूत किंवा अनुस्यूतच आहे. त्या त्या काळात उपलब्ध असलेले ज्ञान जेवढ्या प्रमाणात एकेका माणसाच्या आवाक्यात होते, तेवढ्या प्रमाणात त्याचे पडसाद त्या त्या काळच्या काव्यात आपोआपच उमटत होते. उषांची स्तुती गाणाऱ्या ऋषींच्या ऋचा निसर्गाच्या निरीक्षणावरच आधारलेल्या आहेत. प्रकृती आणि पुरुषांची वर्णने करणाऱ्या

उपनिषत्कारांपासून ज्ञानेश्वरांपर्यंत सर्वांची प्रतिभा त्यांच्या विज्ञानाच्याही पंखावर विहार करीत होती. मेघाकरवी संदेश पाठवणारा कालिदास आपल्या भूगोल ज्ञानाचा वापर करीत होता. मुळा-भाजीच्या टोपलीत विठाबाई पाहणारे संतकवी चांगले चिखलात पाय रोवून उभे होते. पृथ्वीचे प्रेमगीत गाणारे कुसुमाग्रज सृष्टिव्यापारांचेच मनोहर चित्र डोळ्यांसमोर आणीत होते.

पण काव्यव्यवहाराचेही काही संकेत ठरून जातात. ते संकेत निरंकुशांनाही अंकुश लावतात. मानवी मनाची स्पंदने वर्णने करावीत असा काव्याचा मर्यादित हेतू मानणाऱ्यांनीही एका काळी काव्य हे धीरोदात्त नायक, अष्टनायिका यांच्यापुरते सीमित करून ठेवले. सामान्य व्यवहारांचे वर्णन हेच काही अंशी काव्याला निषिद्ध, तेथे भौतिक जगाच्या ज्ञानाला त्यांनी काव्यांतून दूरच ठेवले तर त्यात नवल काय? 'यशसे अर्थकृते' इत्यादी काव्यबाह्य उद्देशच काव्याचे म्हणून सांगणारा मम्मट ही कक्षा व्यवहारविद्ये-पर्यंत जेमतेम वाढवतो. मनुष्यजन्माचे अंतिम ध्येय मोक्षसाधना हे ठरल्यावर व्यवहारविद्येचे रूपही ठरूनच गेले.

अव्वल मराठी काळात स्वराज्याची, मर्दुमकीने जीवनात वेगळा अर्थ आणण्याची नवी क्षेत्रे उपलब्ध झाली तेव्हा मराठी काव्यात वीरवृत्तीचे, कसदार शृंगाराचे दर्शन झाले. त्या काळात युरोपीय संस्कृतीत मूळ धरू लागलेल्या नव्या विज्ञानाचा मात्र आपल्याकडे मागमूस नव्हता. त्याचे दर्शन आपल्याला इंग्रजांच्या संबंधातून झाले. पण त्या काळापर्यंत, विज्ञानाने जन्म दिलेल्या तंत्रविद्येचे भौतिक परिणाम दिसू लागले होते. त्यातून बलवंतांचे बळ वाढत होते, किंबहुना 'ज्ञान हे बल आहे' या भावनेतूनच विज्ञानाची उपासना होत होती. विज्ञान (खरे म्हणजे तंत्रविद्या) आधाराला असल्यामुळे इंग्रजांचा जो अंमल आला त्याचे सामाजिक–आर्थिक परिणाम अधिक प्रचंड आणि म्हणून ढोबळपणे अधिक जाणवणारे होते. वेळ येत गेली तसतसे त्यांचे निराकरण करण्याचे प्रयत्न सुरू झाले. त्यांना उघडच प्रतिकाराचे स्वरूप होते. तुलनेने पाहता तंत्रविद्येबद्दल कौतुकाची, नवलाईची भावना होती ती त्याच पायरीवर

राहिली. विज्ञान हे आपल्याला परदेशी किंवा परकेच वाटत राहिले. शिवाय, त्याच्या वाढीचे वा प्रसाराचे सारे प्रयत्न परक्या भाषेतूनच होत राहिल्यामुळे, विज्ञान आपल्या भावजीवनात कधीच मिळून गेले नाही. ते जीवनाचे कोरडे–बुद्धिगम्य अंग होऊन राहिले. त्याच्याबाबत अंतरीचा जिव्हाळा निर्माण झाला नाही. 'रांगोळी'सारख्या 'साध्याही विषयात किती मोठा आशय' केशवसुतांसारख्या थोर कवीला आढळला. तो पाहण्याच्या वृत्तीचे मूळ इंग्रजी संस्कृतीच्या संबंधात होते. (आशय सर्वस्वी त्यांचा स्वतःचा होता.) असेच विश्वस्पर्शी आशय विज्ञानिकांना खडूच्या कांडीत किंवा मेणबत्तीच्या ज्योतीत दिसत होते. ते आशय सुलभपणे लोकांपर्यंत पोचवण्याचेही प्रयत्न काही विज्ञानिक करीत होते. ते आपल्या जीवनात किंवा काव्यात उमटले नाहीत.

एवढेच नाही, तर उलट प्रकार झाला. विसाव्या शतकात तंत्रज्ञानाचे जे विदारक उपयोग पाश्चात्त्य संस्कृतीत झाले त्यांच्यामुळे विज्ञानाबद्दलच सावध संशयाची एक भूमिका विचारवंतांमध्ये मूळ धरू लागली. इंजिनाला बसलेल्या धक्क्याने आगगाडीच्या अखेरच्या डब्यालाही हेलकावे बसावे त्याप्रमाणे या संशयी भूमिकेचा परिणाम, आपल्याकडेही झाला. येथे विज्ञानाचे व तंत्रज्ञानाचे पाऊलही पुरते पडले नसतानाच हे घडले. विज्ञानाच्या अतिरिक्त प्रगतीचे मानवावर काय परिणाम होतील याचा वेध घेणारी प्रतिभावंतांची दृष्टी यामागे होती. तशीच विज्ञानाचे प्रतिनिधीच भासणाऱ्या सत्ताधाऱ्यांना विरोध करणारी आणि आपल्याच भूतकाळात रमणारी दृष्टीही तिच्यात सामावलेली होती. काव्यातली प्रतिक्रिया गोंधळलेली होती. एखादी कविता 'ये यंत्रा !' म्हणून साद घालीत होती; तर 'काही कविता', "आहे बुद्धीशी इमान। जाणे विज्ञानचि ज्ञान।। परि कोठे तरी आन। ताण पडे।।" या शब्दांत मनाचा कोंडमारा व्यक्त करीत होती. यामध्ये निदान संवेदनेची व्यापकता होती. 'कविता म्हणजे फक्त आत्माविष्कार' असे मानणारे मात्र स्वनिष्ठ भावांनाच प्राधान्य देऊन या परिणामांकडेही पाठच फिरवून होते. मानसिक चिंतनप्रक्रिया हीसुद्धा विज्ञानाचा एक विषय बनून राहिली, तरी कवितेत मात्र त्या चिंतनाचीच अपरीक्षित फलिते यावीत हा प्रकार चालूच राहिला. तंत्रदत्त वस्तूंचे (विज्ञानदत्त

संकल्पनांचे नव्हे) उल्लेख मात्र प्रतिमा म्हणून येत राहिले. त्यातही एक विशेष आहे. असे उल्लेख हटकून इंग्रजी शब्दांच्या रूपाने अवतरत असतात. विज्ञान आपल्याशी सात्म झाले नसल्याची ही खूणच आहे.

असे का होते याचा शोध घेणे कवितेलासुद्धा अगत्याचे आहे. आंतर आणि बाह्य विश्व, चिंतन आणि विज्ञान यांच्यात एक अलंघ्य विरोध कवितेने कल्पिलेला दिसतो. "मी त्या स्वप्नात गद्यग्रथित जग मुळी लोटिले तुच्छतेला" या केशवसुतांच्या ओळीत हा विरोध उत्तम रीतीने व्यक्त झाला आहे. शब्दांच्या कूजितात म्हणजे चिंतनात गुंगणारा प्रतिभावंत जगाला 'तुच्छ' आणि 'गद्यग्रथित' मानतो. पण या जगाच्या ज्ञानात, त्या ज्ञानाच्या प्राप्तीत, इतर सर्व मानवी क्रियाकलापाइतकेच सौंदर्य वा विरूपता, आनंद वा दुःख ही भरलेली आहेत. त्यात रस घेणाऱ्यांना त्यातून हा सारा अनुभव येते असतो आणि तो काव्यानुभवाच्याच तोडीचा असतो असे त्यांचे म्हणणे असते. तो काव्यसंवेदनांसारखाच अनुभवावा, काव्यातून इतरांना संक्रमित करावा. म्हणजे, काव्याचे क्षेत्र विस्तारेल, विज्ञानाचा प्रसार मुरेल हे उघड पण दुय्यम लाभ होत. भावना आणि बुद्धी, ज्ञान आणि विज्ञान, सौंदर्य आणि विचार यांसारख्या संकल्पनांमध्ये जे अकारण द्वैत उभे करण्यात आले आहे, ते दूर होईल हा मुख्य लाभ होय. विज्ञानाचे अकरणात्मक उपयोग होण्याचे एक प्रमुख कारण म्हणजे हे द्वैत आहे. त्यापासून मुक्तता करून घेणे आवश्यक आहे. विज्ञानाची 'गद्यग्रथित'ता हा काही नियम नाही हे जाणवले पाहिजे. आणि म्हणून 'विज्ञानकाव्य' ही या युगाची सांस्कृतिक गरज आहे.

सहज न कळणारे ज्ञान काव्यातून देण्याचा मोठा प्रयत्न संतकवींनी केला. मनुष्यत्वाला अवश्य त्या नीतीच्या आणि आत्मज्ञानाच्या तत्त्वांपासून कायमच्या वंचित राहिलेल्या समाजाला त्यांची जाण देण्यासाठी त्यांनी आपली वाणी खपवली. त्यामुळे त्यांच्या काव्यात उणेपणा आला नाही किंवा त्यांचे ज्ञान पातळ झाले नाही. त्यासाठी त्यांनी ओव्या, अभंग, गोंधळ, हमामा, विराण्या असे रचनेचे नानाविध प्रयोग केले. त्यांना जे महत्त्वाचे वाटले ते त्यांनी केले; जे भावले ते सांगितले. आत्मज्ञानाच्या जागी किंवा त्याच्या

जोडीने विज्ञानासाठी असेच काही करण्यास प्रत्यवाय नसावा. विज्ञान काव्य हा वदतोव्याघात नाही; ती एक भावात्मक किंवा करणात्मक संकल्पना आहे.

अशा ऊर्मीतून शब्दरूपाला आलेली ही विज्ञानाची गाणी, या युगाची–गाणी–'युगाणी' होत. त्यांच्याद्वारे विज्ञानाची प्रमेये आणि तंत्रज्ञानाचे आविष्कार काव्याच्या प्रांतात पाऊल टाकतात. परंपरेने चालत आलेल्या आणि नव्याने उभारीस लागलेल्या बाळगाण्यांच्या रूपात, ती प्रमेये आणि ते आविष्कार लेकुरांच्या गोष्टी होऊन येतात. अणूला खेळगडी समजून त्याचे गूढ कुशल पुसतात, देशाचे पहारेकरी पर्वत उभे करणाऱ्या फत्तरांचे–प्रस्तरांचे–चरित्र सांगतात. जीवांना एकमेकांची ओढ लागते तशी जड वस्तूंनाही एकमेकांकडे ओढणारी शक्ती आहे, तिचे भावगाणे गातात. दिव्याच्या दीपत्काराला विजेचा साक्षात्कार म्हणून ओळखणारा या युगातला बाळ चांदोबाला 'तुझ्या पाठीवर पाय द्यायला येऊ का' म्हणून धिटाईने पुसतो. किंवा 'धाव धाव धावेन' म्हणून 'गत्या' होऊन गतीचे चढते प्रकार दाखवतो. सूर्याजीबाबाची चिमुरडी पोर 'धरणी माझं नाऽव' म्हणून गिरक्या घेत गाते. हाताची बोटे दहा म्हणून आपली अंकगणना दहावर आधारली गेली. थोटया माणसांच्या गावात ती दोनावर आधारली गेली असती. गणक यंत्रात ती वापरतात. थोटयांच्या गावची ही गंमत कोणी सांगत आहेत. कोणी 'रस्ता बांधू चला चला' म्हणत डोंगरदऱ्यांतल्या मानवतेला गती द्यायला निघताहेत. येथे जुन्याचे भान आहे, नव्याला स्थान आहे. म्हणून कार्यरत यंत्रे जे विविध शब्दनाद करीत असतात त्यांचा 'यंत्रजागर' मंत्रजागराची जागा घेऊन आहे.

नव्या विज्ञानातल्या असंख्य शब्दांना आपल्या भाषेत रुळलेले शब्द नाहीत. असले तर कोरडे शास्त्रीय आहेत. तेव्हा नवे शब्द बनवणे ओघानेच आले. ते बनवतानाही साधेपणा, सोपेपणा, चपखलपणा आणि मराठीच्या प्रकृतीशी ताळमेळ राखण्याचा प्रयत्न केला आहे. गावरान मराठीत या नव्या संकल्पना कशा उतरल्या असत्या याची कल्पना करून हे शब्द उपयोजिले आहेत. म्हणून विजेचा दिवा काचेच्या 'गेंदा'त लागतो तेव्हा धातूची 'तात' खुलते.

चांदोबावर जाण्यासाठी 'गवेश' घालून 'राकेट्' झाडावे लागते म्हणजे मग धरणीमायच्या खेचेतून सुटून जाण्याइतका 'सुटवेग' प्राप्त होतो. लोळणे आपल्याला माहीत असते; रुळासारखे फिरणे म्हणजे मात्र 'रोळणे.' आभाळात जायला 'आभाळगाडी' पुरते, 'स्पेस्‌शिप्'ची गरज नाही. 'गणकोबा' आपल्या दशमानासारख्याच 'दोनमाना'चा उपयोग करतात. अणू हा कण आणि 'कणुल्यां'चा पुंजका आहे; त्यांच्यावर जसा वीजभार असेल, त्याप्रमाणे त्यांना 'धनुले, उनले, विणुले' म्हटले. महास्फोटांचे प्रवर्तक 'बिनुले' फुटून त्या उष्णतेने एकात एक मिळून जातात तेव्हा 'फुजत' असतात. काही खडकांना धरणीमाय पोटात ठाय देते तेव्हा त्यांच्या रूपांतरित कणांचे 'पैलवान' स्फटिक बनतात.

लोळागोळा मातीचेदेखील रूपांतर होत होत, तिला स्फटिकाचे धारदार आणि सौंदर्यशाली पैलू प्राप्त होतात. कालाच्या ओघात आणि आसमंताच्या स्थितीनुसार हे परिवर्तन घडून येत असते. असे परिवर्तन सृष्टीच्या आणि जीवनाच्याही विविध अंगांमध्ये चालूच असते. कवितेच्या, गाण्यांच्या आशय-विषयातील परिवर्तनाचा एखादा पैलू 'युगाण्यां'च्या रूपात दिसावा. एरवी 'गाण्याने श्रम वाटतात हलके, हेही नसे थोडके!'

* * *

'मानवजातीसमोर उभे ठाकत असलेले नवे नवे अनुभव काव्यजाणिवेच्या कक्षेत आणू पाहणारी 'समकालीन' काव्यरूपे युगाण्यांमध्ये दिसतात' म्हणून 'सत्यकथे'ने मे ७७ अंकात वरील भूमिका आणि तीन युगाणी वानगीदाखल प्रसिद्ध केली. रसिक विचारवंत दि. के. बेडेकर यांना युगाण्यांचा प्रसार व्हावा अशी फार इच्छा होती. साहित्य म्हणून युगाण्यांच्या आशयावर टिपणांची गरज नाही. मात्र या नव्या प्रयोगातील काही अनोळखी वा विज्ञानिक भागाबद्दल थोडे लिहिणे पालक व शिक्षकांसाठी जरूर वाटते.

'दीपत्कारा'तली वीज सळसळती, कारण तरंगरूप आहे. आकाशातली वीज तिच्याचसारखी असते हे ज्ञान प्रथम बेंजामिन फ्रँकलिनने पतंगाच्या प्रयोगातून सिद्ध केले.

चांदोबा आपल्यापासून 'एवढ्या लांब' म्हणजे मुंबई–पुणे अंतराच्या सुमारे १९२० पट दूर आहे. पृथ्वीच्या ओढीतून सुटून जायचे तर सेकंदाला सव्वा अकरा किलोमीटर इतका सुटवेग प्राप्त व्हायला हवा. तसाच सर्व सोयींनी युक्त असा गगनी जाण्याचा 'गवेश' हवा. चंद्राची खेच पृथ्वीपेक्षा खूपच कमी असल्याने माणूस तेथे खूप उंच उडी मारू शकतो हे आता सर्वांना माहीत झाले आहे.

गणगावच्या दोनमान पद्धतीत १ २ ३ ४ हे आकडे १ १० ११ १०० असे मांडले जातील. ही पद्धत गणकयत्रांमध्ये वापरतात.

वायु व द्रव रूपातून पृथ्वीचे द्रव्य घनरूपात आल्यावर सुमारे चारशे कोटी वर्षांपूर्वी पहिले खडक बनले असे मानतात. खडकांची रूपांतरे रोज चालूच आहेत. ज्वालामुखींमधून धरणीमाई आग ओकत असते. डोंगर–घाटातले रस्ते बनवताना प्रस्तरांशीच गाठ असते.

धरणी आपल्याभोवती घेते ती गिरकी, पण सूर्याला प्रदक्षिणा घालते ती फिरकी. या फिरकीत तिचा आस सूर्याकडे कललेला असतो म्हणून तिरकी म्हटले.

जड-ओढ म्हणजे रूढ शब्दात गुरुत्वाकर्षण. माणसांची ओढ अंतराने वाढते म्हणतात. जड-ओढ मात्र अंतराच्या वर्गप्रमाणात घटते. स्थळाच्या तीन अधिक काळाची एक अशा विश्वाच्या चार मिती मानतात. जड वस्तूच्या अस्तित्वामुळे विश्वाकृतीत येणाऱ्या वक्रतेचे मान म्हणजे जड–ओढ अशी उपपत्ती आहे. हे सारे सहजपणे न कळले तरी त्यातून अनेक उपयुक्त तथ्ये मिळतात.

नित्य धावरा मुलगा म्हणजे गत्या, गतिया. त्याच्या एकाहून एक वाढत्या गतींचे वर्णन गत्याच्या गाण्यात आहे. आवाजाच्या वेगाने कोणी जाऊ लागला तर हाक मारणाऱ्याचा आवाज त्याला पोचणार नाही. वेग वाढवून कितीही वाढला तरी प्रकाशाच्या वेगाहून अधिक होणार नाही. वेग जसा वाढत जातो तसे वस्तुमान कमी होत जाते आणि अंती, कण म्हणा की तरंग

म्हणा अशा उजेडकणांच्या अवस्थेला वस्तू पोचते. आपली कालविषयक कल्पनाच उजेडकणांच्या वेगावर अवलंबून असल्यामुळे उजेडकणाच्या तुलनेने इतरांचे वय सारखेच वाढतच राहील.

अणूचे अस्तित्व इतर साधनांनीच समजून घ्यावे लागते. त्यामुळे तो जसाच्या तसा आणि असेल त्या ठायी दिसणे शक्य नाही. तो अनेक उपकणांचा बनलेला असतो. त्याचे शक्तीत रूपांतर होते ते निश्चित गणिती सूत्रांनुसार. मूलतत्त्वांची आवर्तन सारणीत वर्गवारी केली आहे त्या वर्गांना आळी म्हटले आहे. रसायनिक प्रक्रियांनी वस्तूंची माळवण होते, ती ऋण-भारधारी उणुल्यांच्या संयोगाने; तर अणुशक्ती निर्माण होते ती गाभ्याच्या कणुल्यांमुळे.

विश्वनाथ खैरे

इये विश्वी सचराचरी
आणि जिज्ञासाही जंववरी
स्फूर्ती दीजो तंववरी
एकलव्य ।।

# एकलव्य : नाटक

विश्वनाथ खैरे

साधना प्रकाशन

साने गुरुजींचे

# बाल-कुमारांसाठी वाङ्मय

| | |
|---|---|
| बापूजींच्या गोड गोष्टी भाग १ | ०–५० |
| बापूजींच्या गोड गोष्टी भाग २ | ०–५० |
| बापूजींच्या गोड गोष्टी भाग ३ | ०–५० |
| बापूजींच्या गोड गोष्टी भाग ४ | ०–५० |
| बापूजींच्या गोड गोष्टी भाग ५ | ०–५० |
| बापूजींच्या गोड गोष्टी भाग ६ | ०–५० |
| कुमारांपुढील कार्य | ०–७५ |
| माझी दैवते ( आ. २ ) | ३–०० |
| जीवनाचे शिल्पकार | १–२० |
| भारतीय नारी | १–०० |
| लोकमान्य टिळक | १–४० |
| आपले नेहरू | १–५० |
| भगवान श्रीकृष्ण | १–०० |
| कावळे | १–०० |
| मोरी गाय | ०–७५ |
| दिगंबरराय | १–०० |
| श्रीशिवराय | १–४० |
| साक्षरतेच्या कथा | १–५० |
| दारूबंदीच्या कथा | १–५० |

साधना प्रकाशन, ४३०-३१ शनिवार पेठ, पुणे–४११ ०३०

फोन : ४७०६८६

